# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

प्रभात पुणे, बुधवार, दि. २० जानेवारी २०१६

# साहेबराव बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमाला मंगळवारपासून

**यंदाचे १५वे वर्ष : विविध विषयांवर तज्ज्ञ गुंफणार पुष्प**



राजगुरुनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मंगळवार (दि. २६) ते सोमवार (दि.१ फेब्रुवारी) दरम्यान 'साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाले'चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील व व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष प्रा.अनिल कुलकर्णी यांनी दिली.

व्याख्यानमालेचे हे १५ वे वर्ष आहे. मंगळवारी (दि.२६) सकाळी ९.३० वाजता राज्यसभेचे खासदार संजय राऊत हे 'मी अनुभवलेले बाळासाहेब' या विषयावर आपले अनुभव कथन करणार आहेत. बुधवारी (दि.२७) सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय अणूउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर हे 'सर्वांगीण ग्रामीण विकास; काही संकल्पना' या विषयावर आपले मौलिक विचार मांडणार आहेत. गुरुवारी (दि.२८) विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुण गुजराथी हे 'लोकशाही काल, आज आणि उद्या' या विषयावर आपले चिंतन मांडणार आहेत. शुक्रवारी (दि.२९) जीवन विद्या मिशनचे आजीव सदस्य प्रल्हाद पै हे 'उत्कर्ष विद्यार्थ्यांचा' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. शनिवारी (दि.३०) मोटिव्हेशनल ट्रेनर रत्नाकर अहिरे हे 'यशस्वी होण्याचे मानसशास्त्र' सांगणार आहे. रविवारी (दि.३१) नामवंत शल्यचिकित्सक डॉ. विठ्ठल लहाने हे 'जीवनातील प्राधान्य' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. १ फेब्रुवारीला शेवटचे पुष्प नामवंत वक्ते अभय भंडारी हे 'शिवचरित्र आणि सद्यस्थिती' या विषयावर गुंफणार आहेत.

उत्तर पुणे जिल्ह्यात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आयोजनामुळे नावाजलेल्या या व्याख्यानमालेत तालुका व परिसरातील नागरिकांनी सहभागी व्हावे, सर्व पालकांनी, माजी विद्यार्थ्यांनीही या व्याख्यानरूपी वैचारिक मेजवानीचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले आहे.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख